## स्पे. मु. नं. ६/२०१५ मधील निशाण ३७ खालील आदेश

१) वादीने निशाणी ३७ अन्वये दिनांक २५.१२.२०१४ रोजीचे साठेखताबाबत दुय्यम पुरावा देण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर प्रतिवादीने म्हणणे दाखल करून प्रस्तुत अर्जास विरोध दर्शविलेला आहे.

२) याठिकाणी वादी, प्रतिवादी यांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

३) वादीने अर्जामध्ये कथन केलेले आहे की, दि. २५.१२.२०१४ रोजी नोटरी यांच्यासमोर साठेखत दस्त नोंदविलेला आहे. प्रतिवादी नं. १ ने वादीकडुन साठेखतापोटी ५५ लाख रूपये स्विकारलेले आहे व साठेखताचा दस्त वादी नं. ५ यांच्याकडे ठेवला होता. दावा मिळकत ही नविन शर्तीची असल्यामुळे उपविभागीय अधिकारी, माळशिरस यांची परवानगी काढण्यासाठी मुळ साठेखत आवश्यक आहे म्हणुन तो प्रतिवादी नं. १ ने वादी नं. ५ कडुन घेतले आहे. त्याबाबत प्रतिवादी नं. १ यांची विचारपुस केली असता प्रतिवादी नं. ५ ने प्रतिवादी नं. २ व ३ यांना खरेदी दिलेले आहे. वादीने नोटरी यांच्याकडील स्थळप्रतीवरून खरी नक्कल हजर केलेली आहे. त्यामुळे तो साठेखत पुराव्यासाठी दाखल करणे आवश्यक आहे. प्रतिवादी नं. १ यांस दि. ०६.०१.२०१६ रोजी वकीलामार्फत नोटीस पाठवुन मुळ दस्त हजर करण्यास कळविले परंतु तो त्यांनी दाखल केलेला नाही. वादीने दि. २८.०१.२०१६ रोजी दिवाणी प्रक्रिया आदेश ११ नियम १४ अन्वये हजर करावा असे सांगितले असता त्याने तो दस्त त्यांच्याकडे नसल्याचे सांगितलेले आहे. त्यामुळे सदर साठेखतास दुय्यम पुरावा म्हणुन वाचण्यास परवानगी मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. सबब अर्ज मंजुर करावा अशी मागणी केलेली

आहे.

४) प्रतिवादीतर्फे सदर अर्जावर म्हणणे दाखल करून प्रस्तुत अर्जास विरोध दर्शविलेला आहे. त्यांचे कथन की, सदर मुळ दस्ताचा कब्जा हा वादीकडे आहे. दाव्यासोबत मुळ दस्त दाखल केलेला नसल्याने दावा दखलपात्र नाही याची दखल प्रतिवादीने कैफियतीमध्ये केलेली आहे. वादीचा निशाणी ३० चा अर्ज रद्द झालेला आहे. दाव्यासोबत दाखल केलेली झेरॉक्स प्रत आहे. त्याबाबत दुय्यम पुरावा देता येणार नाही त्यामुळे अर्ज नामंजुर करावा अशी मागणी केलेली आहे.

५) याठिकाणी वादी, प्रतिवादी यांचे म्हणणे व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने विचार करता वादीतर्फे निशाणी ४ सोबत अ.क्र. ३ वर दिनांक २५.१२.२०१४ च्या साठेखताची छायांकित प्रत हजर केलेली आहे. याठिकाणी छायांकित प्रत कशाप्रकारे या वादीच्या ताब्यात आली याचा स्पष्ट उल्लेख केलेला नाही. याठिकाणी छायांकित प्रत असल्यामुळे ती छायांकित प्रत मुळ प्रतीशी तुलना केली अशा प्रकारची वादीचे कथन नाही. फक्त छायांकित प्रत आहे या कारणावरून वादीस दुयम पुरावा देण्यासाठी परवानगी देता येणार नाही. याठिकाणी वादीचे पुढे कथन की, वादी नं. ५ यांनी प्रतिवादी नं. १ यांस मुळ दस्त दिलेला आहे. याअनुषंगाने वादीने दाव्यामध्ये कोठेही नामोल्लेख नाही. तसेच दाव्यापूर्वी मुळ प्रतिवादी नं. १ कडे मागणी केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे मुळ दस्ताचा कब्जा कोणाकडे होता हे वादी शाबित करू शकलेला नाही. प्रतिवादी नं. १ ने मुळ त्याच्याकडे दिले नव्हते असे कथन केलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये वादी हे दुयम पुरावा मागणीसाठी योग्य व संयुक्तिक कारण न दिल्यामुळे वादीचा अर्ज मंजुर करण्यासारखा नाही. सबब या व वरील कारणांचा विचार

करता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

वादीचा निशाणी ३७ वरील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

( **एस. एस. इंदलकर** )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
माळशिरस.

दिनांक : १५.१२.२०१६.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original Order.

(a) Name of the Stenographer : **S. M. Malkapalli**

(b) Court : **Civil Court Senior Division, Malshiras.**

(c) Order signed by P.O. on : **15.12.2016.**

(d) Order uploaded on : **15.12.2016.**